॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनी नॅशनल ॲकेडमिक डिपॉझिटरी अंतर्गत आपल्या पदवी प्रमाणपत्राची त्वरीत नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी केले आहे.

भारत सरकारच्या केंद्रीय मनुष्यबळ विकास विभागाने डिजिटल इंडिया अंतर्गत नॅशनल ॲकेडमिक डिपॉझिटरी (NAD) हा अभिनव उपक्रम सुरु केला आहे. यामध्ये आपल्या पदवी प्रमाणपत्राचे डिजिटल सुरक्षा संचयन होणार असून प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याचे डिजिटल शैक्षणिक प्रमाणपत्राचे स्वप्न साकार होणार आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने गतवर्षी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या पुढाकाराने यासाठी एनएसडीएल या कंपनी समवेत सामंजस्य करार केलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र घेतलेले आहेत त्या विद्यार्थ्यांना या अंतर्गत नोंदणी करता येणार आहे. या नोंदणीबाबतची माहिती प्रभारी संगणक केंद्र प्रमुख व पध्दती विश्लेषक डॉ.विनोद पाटील यांनी दिली. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना होम पेजवर असलेल्या डिग्री सर्टिफिकेशन डिपॉझिटरी (NAD) या लिंकवर लिक करुन आपली नोंदणी करता येणार आहे. आधार कार्ड असलेल्या व या आधार कार्डशी जो भ्रमणध्वनी क्रमांक लिंक केलेला असेल त्या भ्रमणध्वनी क्रमांकावर ओटीपी प्राप्त होईल व त्याचा वापर करुन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी त्यात एनएडी आयडी क्रमांक विद्यार्थ्यांना प्राप्त होईल. त्यानंतर तो आयडी क्रमांक विद्यार्थ्यांनी convocation@nmu.ac.in वर ई-मेल करावा. विद्यापीठास कळविल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांचे डिजिटल स्वाक्षरीचे पदवी प्रमाणपत्र उपलब्ध होईल. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही त्यांना देखील नोंदणी करता येणार असून त्या विद्यार्थ्यांना नोंदणीच्या वेळी आपला फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करावी लागेल.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या तीन लाख विद्यार्थ्यांनी आजवर पदवी प्रमाणपत्र नेलेले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांनी नॅशनल ॲकेडमिक डिपॉझिटरी अंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य आहे. दहावी व बारावीच्या सीबीएसईच्या विद्यार्थ्यांना देखील आपल्या प्रमाणपत्राची नोंदणी या अंतर्गत करता येणार आहे. या सुविधेमुळे डिजिटल व ऑनलाईन प्रमाणपत्र सुरक्षित राहणार असून प्रमाणपत्राची प्रत विद्यार्थ्यांना स्वतः जवळ बाळगण्याची गरज भासणार नाही. कायमस्वरुपी प्रमाणपत्राचे रेकॉर्ड ऑनलाईन उपलब्ध राहील. प्रमाणपत्र गहाळ अथवा खराब होण्याची कोणतीही भिती नाही. प्रमाणपत्र उपलब्ध करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. कुठेही सहजपणे ऑनलाईन हे प्रमाणपत्र पाहता येणार असून नियुक्ती देणाऱ्या संस्था, कंपन्या, बँका यांना तात्काळ प्रमाणपत्राची ऑनलाईन पडताळणी करता येणार आहे. व्हिसा आणि पासपोर्टसाठी देखील त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होणार असल्याची माहिती डॉ.विनोद पाटील यांनी दिली.

---

जा.क्र: उमवि/१६/हस्तदेय/२०१८ — दिनांक : २३ एप्रिल,२०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रती/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी